महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८
Ph.No-022-24934214/ Tel Fax- 022-24936881 E.mail ID--deanrapmc@gmail.com


जा.क्र.राआपोवैम/आस्था/प्राध्या./सहयो.प्राध्या/जाहिरात/7349/२०२२ दिनांक :- 04 OCT 2022

## पाहीजेत

संदर्भ :- १. शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस १५०८/प्र.क्रं. ९४/०८/वैसेवा-१, दिनांक ७ सप्टेबर २०११

२. शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.आयुसे-०७२०/प्र.क्र. ४१/आयु -१, दि.१७.१२.२०२०.

१) उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये निर्देशित केल्यानुसार या महाविद्यालयातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर ३६४ दिवसांचे कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यासाठी विहीत अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छूक उमेदवारांनी दि.११.१०.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखतीसाठी हजर रहावे.

२) रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल :

| विषय | प्राध्यापक | | सहयोगी प्राध्यापक | |
|---|---|---|---|---|
| | एकुण रिक्त पदे | | एकुण रिक्त पदे | |
| | (खुला प्रवर्ग) | अरक्षण | (खुला प्रवर्ग) | अरक्षण |
| संस्कृत संहिता सिध्दांत | .... | .... | ०१ | .... |
| शारिररचना | ०१ | .... | .... | .... |
| शारिरक्रिया | .... | .... | ०२ | .... |
| द्रव्यगुण | ०१ | .... | ०१ | .... |
| रसशास्त्र | ०१ | .... | .... | .... |
| स्वस्थवृत्त | .... | ०१ (अ.जा) | ०१ | .... |
| अगदतंत्र | .... | .... | ०१ | .... |
| पंचकर्म | .... | .... | ०१ | .... |
| कौमारभृत्य | .... | .... | .... | ०१ (अ.जा) |
| शालाक्यतंत्र | .... | .... | ०१ | .... |
| एकुण रिक्त पदे | ०३ | ०१ | ०८ | ०१ |

| | | |
|---|---|---|
| १) | वयोमर्यादा | महाराष्ट्र राज्य शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, दि.२६ जुलै, २०१३ अन्वये विहित केलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदासाठी उमेदवाराचे वय ५० वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| २) | शैक्षणिक अर्हता | अ) संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी. ब) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.२८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, |

| | | |
|---|---|---|
| | | १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>क) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वतःचे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>ड) इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| ३) | अनुभव | अ) **प्राध्यापक** या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक (प्रपाठक) पदाचा किमान पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>ब) **सहयोगी प्राध्यापक** या पदासाठी संबधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक (अधिव्याख्याता) या पदाचा किमान पाच वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील.<br>तसेच दोन्ही पदांसाठी संबधित उमेदवाराकडे भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोग, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांनी नवीन यांनी नवीन अध्यापक सांकेतांक (Permanent NEW NCISM TEACHER CODE) असणे आवश्यक आहे. |
| ४) | मानधन | अ) प्राध्यापक - प्रतिमाह रु.५०,०००/-<br>ब) सहयोगी प्राध्यापक - प्रतिमाह रु.४०,०००/- |
| ५) | नियुक्ती कालावधी व इतर अटी | १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यन्त अथवा (३६४) दिवसांच्या कालावधीकरीता या पैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. मात्र कोणत्याही परिस्थितीत (३६४) दिवसानंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही.<br>२. मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करणा-या उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा अशा उमेदवाराचा अर्ज त्या प्रवर्गासाठी विचारात घेतला जाणार नाही.<br>३. नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.<br>४. सदर पदावर नियमीत उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.<br>५. नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.<br>६. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.<br>७. करार पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील. |

| | | |
|---|---|---|
| | | ८. करार पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील. |
| | | ९. करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | १०. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही. |
| | | ११.नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आंत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल. |
| | | १२.कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| | | १३.शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील. |
| | | १४.नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत. |
| | | १५.उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order) सोबत असणे आवश्यक राहील. |

इच्छुक उमेदवारांनी www.mahayush.gov.in तसेच www.ayurvedinstitute.com या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्राच्या सांक्षांकीत प्रतीसह अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-१८ येथे दि.११.१०.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता (Walk-in-interview) प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

(डॉ.के.राजेश्वर रेड्डी)
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई.

## अर्जाचा नमुना
महाराष्ट्र शासन
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई - ४०० ०१८

पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून त्यावर स्वत स्वाक्षरी करणे.

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालयातील प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक ...................... (विषय) या पदावर करार पध्दतीने ३६४ दिवसाच्या कालावधीकरीता नियुक्तीसाठी अर्ज

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नांव | : | | | |
| | | | आडनाव | स्वत:चे नांव | वडिलांचे/पतीचे नांव |
| २) | पत्रव्यवहाराचा पत्ता | : | पिनकोड | | |
| | | | एसटीडी कोडसह घरचा दुरध्वनी क्रमांक :<br>भ्रमणध्वनी क्रमांक :<br>Email address : | | |
| ३) | जन्मदिनांक | : | | | |
| ४) | अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिनांकास वय :- वर्ष महिने दिवस | | | | |
| ५) | राष्ट्रीयत्व : | | | | |

६) ज्या प्रवर्गासाठी अर्ज करावयाचा आहे त्या ठिकाणी (✓) अशी खुण करावी. एकापेक्षा जास्त खुणा केल्यास अर्ज बाद समजला जाईल.

| अ.जा. (SC) | अ.ज. (ST) | वि.जा.(अ) (VJ-A) | भ.ज.(ब) (NT-B) | भ.ज.(क) (NT-C) | भ.ज.(ड) (NT-D) | वि.मा.प्र. (SBC) | इ.मा.व. (OBC) | खुला (OPEN) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७) जात वैधता प्रमाणपत्र आहे का : होय / नाही

८) शैक्षणिक अर्हता : बीएएमएस प्रथम वर्षापासून सुरुवात करावी व सोबत सर्व वर्षाच्या साक्षांकित मार्कशिट जोडाव्यात.

| अ.क्र. | बोर्डाचे / विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण केलेल्या परीक्षा | उत्तीर्ण केल्याचे वर्ष | प्राप्त टक्केवारी | शासकीय सेवेतून निवृत्त झाले असल्यास, प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |

९) अवगत असणाऱ्या भाषा : (योग्य ठिकाणी (✓) अशी खूण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | संस्कृत / अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

१०) कामाचा अनुभव : (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या असतील तरच ग्राहय धरला जाईल.)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | धारण केलेले पद | वेतनश्रेणी व इतर भत्ते | अनुभवाचा कालावधी | विद्यापीठाची मान्यता होती काय? असल्यास विद्यापीठाचे पत्र जोडावे | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

११) प्रकाशित लेखांचा तपशील (लेखांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

प्रकाशित पुस्तकांचा तपशील :

१२) पुरस्कार मिळाले असतील तर त्यांचा तपशील (प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यांत याव्यात)

१३) अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचा तपशिल :

| | |
|---|---|
| १. | |
| २. | |
| ३. | |
| ४. | |
| ५. | |
| ६ | |
| ७. | |
| ८. | |
| ९. | |
| १०. | |

| | | |
|---|---|---|
| | ११. | |
| | १२. | |
| | १३. | |
| | १४. | |
| | १५. | |
| | १६. | |
| | १७. | |
| | १८. | |
| | १९. | |
| | २०. | |
| | २१. | |
| | २२. | |
| | २३. | |
| | २४. | |
| | २५. | |
| | २६. | |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी............................................... प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो/करते की, वर नमूद केलेली माहीती पूर्णतः खरी असून ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या ठिकाणी कोणत्याही टप्प्यावर किंवा नियुक्तीनंतर रद्द करण्यांत येईल आणि माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे. तसेच सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी पध्दतीवर असल्यामुळे नियमित नियुक्तीसाठी मला हक्क सांगता येणार नाही आणि जाहिरातीत उल्लेखित कारणास्तव नियमित नियुक्तीचा उमेदवार उपलब्ध झाल्यास माझी तात्पुरत्या स्वरुपाची कंत्राटी नेमणूक आपोआप रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : उमेदवाराची स्वाक्षरी

## DUTIES & RESPONSIBILITIES (AS PER MAHARASHTRA GOVT.RULES :

### PROFESSOR :

1) The Professor will have to teach the subject to the student in the college as per the instruction of the HOD of his/her subject in the college.
2) In case of Clinical subjects, he/she will have to impart clinical instruction in his/her subject to the students in the college as per the instruction of the HOD of his/her subject in the college.
3) He/She will have to assist the HOD of his subject in the development of his/her department and maintain it up to date.
4) He/She will be responsible for completion of his subjects assigned by HOD within the prescribed period.
5) He will have to assist the HOD of his/her subject in carrying out research in the concerned subject.
6) He/She will have to carry out any other duties as may be assigned to him/her by his/her HOD and Dean of the college.

### ASSOCIATE PROFESSOR :

1) The Associate Professor will have to teach the subject to the student in the college as per the instruction of the Professor of his/her subject in the college.
2) In case of Clinical subjects, he/she will have to impart clinical instruction in his/her subject to the students in the college as per the instruction of the Professor of his/her subject in the college.
3) He/she will have to assist the professor of his subject in the development of his/her department and maintain it up to date.
4) He will have to assist the professor of his/her subject in carrying out research in the concerned subject.
5) He/She will have to carry out any other duties as may be assigned to him/her by his/her Superiors.

**Dean,**
**R.A.Podar Medical College,**
**Worli Mumbai**

८) मुलाखतीचे वेळापत्रक (Walk in Interview)

| पदनाम | मुलाखतीचा दिनांक व वेळ | मुलाखतीचे ठिकाण |
|---|---|---|
| प्राध्यापक | दि.११.१०.२०२२<br>सकाळी ११.०० वाजता | अधिष्ठाता यांचे दालन,<br>रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी,<br>मुंबई-१८. |
| सहयोगी प्राध्यापक | दि.११.१०.२०२२<br>सकाळी ११.०० वाजता | अधिष्ठाता यांचे दालन,<br>रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी,<br>मुंबई-१८. |

**महत्वाची सुचना :-** १) उमेदवारानी मुलाखतीस येतांना सर्व संबधीत मुळ कागदपत्रे व त्याच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात तसेच आरक्षीत पदासाठी संबधीत उमेदवारांनी मुळ जात प्रमाणपत्र आणि जात वैद्यता प्रमाणपत्र, अनुभव प्रमाणपत्र मुळ संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणने अनिवार्य राहील.उमेद्वारांना सुचित करण्यात येते कि, आवेदनपत्राचा नमुना, अर्हता, अटी ई.बाबतचा सविस्तर तपशिल ww.mahayush.gov.in व www.ayurvedinstitute.com या वेबसाईटवरुन संबधीतांनी सविस्तर माहीतीच्या अर्जाचा नमुना प्राप्त करवुन घ्यावा.

(डॉ.के.राजेश्वर रेड्डी)
अधिष्ठाता,
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी, मुंबई.